उपसंचालक (वित्त व लेखा) वाशी, नवी मुंबई या कार्यालयात कार्यरत असलेल्या २० करार/कंत्राटी पध्दतीवरील कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः मरालॉ २०१९/ प्र.क्र.११६/लॉटरी-३

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय,
आठवा मजला,नवीन प्रशासन भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई -३२.
दिनांक : १ ऑगस्ट, २०१९

संदर्भ- शासन निर्णय क्रमांकः मरालॉ २००९/ प्र.क्र.११३/लॉटरी-३

प्रस्तावना :-

उपसंचालक (वित्त व लेखा) वाशी, नवी मुंबई या कार्यालयात सध्या करार/कंत्राटी पध्दतीवरील कार्यरत असलेल्या वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ लिपिक अशा २० कर्मचाऱ्यांना सन २०१२ पासून संबंधित पदाचे प्रारंभिक वेतन + ग्रेड वेतन + महागाई भत्ता या रकमेच्या ५०% इतकी रक्कम वेतन म्हणून देण्यात येत आहे. आता सदर २० कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

उपसंचालक (वित्त व लेखा) वाशी, नवी मुंबई या कार्यालयात सध्या करार/कंत्राटी पध्दतीवरील कार्यरत असलेल्या २० कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ लिपिक पदाचे प्रारंभिक वेतनाच्या ५०% + महागाई भत्ता इतकी रक्कम वेतन म्हणून मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपसंचालक (वित्त व लेखा) वाशी, नवी मुंबई कार्यालयातील वरिष्ठ लिपिक यांना मूळ वेतन रू.१२,७५०/- + महागाई भत्ता व कनिष्ठ लिपिक यांना मूळ वेतन रु. ९९५० + महागाई भत्ता एवढे वेतन अनुज्ञेय राहील.

३. सदर निर्णय या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या आ.पु.क. व व्यय-७ या कार्यासनसाच्या अनौ. क्र. २३२/आपुक/१३/०५/२०१९ व अनौ.सं.क्र.१५७/१९/व्यय-७,दि.२१/०५/२०१९ यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर करार/कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त केलेल्या पदांवरील वेतनाचा खर्च मागणी क्र.जी-२, २०७५ संकीर्ण सर्वसाधारण सेवा,१०३ राज्य लॉटरी (००) (०१) प्रमुख लॉटरी (२०७५०४७२) १० कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१३१५४५७१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Sanjay Govind Gulekar

Digitally signed by Sanjay Govind Gulekar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e90536e66642b551e074eeed981e9a9023379b24aff46571a375911517c5d9c, serialNumber=ac297a1d223702ad6340fb586bae05935b56f565ac01cfb26bbdf22d16a71a81, cn=Sanjay Govind Gulekar
Date: 2019.08.02 14:47:35 +05'30'

(संजय गुळेकर)
कक्ष अधिकारी तथा राज्य लॉटरी अधिकारी,
वित्त विभाग,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई,महाराष्ट्र
२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३. निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई .
४. आयुक्त, राज्य लॉटरी,यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
५. वित्त विभाग,सेवा१०-अर्थ/.क.पु.आ/९-सेवा/७-, मंत्रालय, मुंबई३२-
६. लेखा अधिकारी,रोख शाखा,राज्य लॉटरी संचालनालय, मंत्रालय,मुंबई.
७. कक्ष अधिकारी,लॉटरी२-, राज्य लॉटरी संचालनालय, मंत्रालय,मुंबई.
८. उपसंचालक (वित्त व लेखा), वाशी, नवी मुंबई.
९. लेखा अधिकारी राज्य लॉटरी कार्यालय (प्रशासन),वाशी,नवी मुंबई.
१०.निवड नस्ती, लॉटरी.३-